**धुळे जिल्हयातील पाझंरा नदीवरील दातर्ती ता. साक्री व बोरी नदीवरील निमगुळ धुळे ग्रामीण, येथील प्रस्तावित असलेल्या वाळू घाटांची पर्यावरण विषयक लोकसुनावणी नियोजन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे येथे दि. २६/११/२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात आली. सदर झालेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त.**

---

धुळे जिल्हयातील पाझंरा नदीवरील दातर्ती ता. साक्री व बोरी नदीवरील निमगुळ धुळे ग्रामीण, येथील प्रस्तावित असलेल्या वाळू घाटांची पर्यावरण विषयक लोकसुनावणी नियोजन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे येथे दि. २६/११/२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात आली. सदर सुनावणी घेणेकामी मा. अपर जिल्हाधिकारी, धुळे यांचेकडील पत्र क्र.गौ.ख./कावि/५६६/२०२१ दि.२४/११/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मा. निवासी उपजिल्हाधिकारी तथा मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी,'जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे यांना प्राधिकृत करण्यात आले होते. त्यानुसार समीतीचे अध्यक्ष मा. श्री. संजय गायकवाड, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अप्पर जिल्हा दंडाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

सदरची लोकसुनावणी सुरू करण्यापूर्वी मा. अध्यक्ष यांनी संयोजकास कोरम बाबत विचारणा केली असता, संयोजक श्री. अजय चव्हाण, यांनी असे सांगितले की, केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या अधिनियम, २००६ व सुधारीत अधिसुचना दि. ०१/१२/२००९ मधील तरतुदी प्रमाणे कोरमची अवश्यकता नाही. तसेच मा. सदस्य सचिव, म.प्र.नि. मंडळ, यांच्या दि. ०३/११/२०२१ च्या कार्यालयीन आदेशानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळा तर्फे सदस्य म्हणून प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नाशिक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. परंतू प्रादेशिक अधिकारी, नाशिक यांच्या पूर्व नियोजित कार्यक्रमामुळे ते हजर राहू शकणार नसल्याचे त्यांनी कळविले असल्याचे मा. अध्यक्ष यांना संयोजकानी सांगितले.

श्री. अजय चव्हाण, उप-प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, धुळे यांनी दिनांक २६ नोंव्हेबर २०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता. धुळे जिल्हयातील पाझंरा नदीवरील दातर्ती ता. साक्री व बोरी नदीवरील निमगुळ धुळे ग्रामीण, येथील प्रस्तावित असलेल्या वाळू घाटांच्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीसाठी श्रीमती हेमांगी पाटील उप जिल्हाधिकारी (प्रशासन) जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे तसेच उपस्थित मान्यवर व इतर नागरिकांचे स्वागत केले.

केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या अधिनियम, २००६ व सुधारीत अधिसुचना दि. ०१/१२/२००९ मधील तरतुदी प्रमाणे सदरील जाहीर लोकसुनावणी साठी धुळे जिल्हा साक्री तालुक्यातील मौजे दातर्ती व धुळे तालुक्यातील निमगुळ येथील प्रस्तावित असलेल्या वाळू घाटांची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी प्रस्तावाबाबत मंजुरी करीता पर्यावरण विषयक लोक सुनावणी घेणे बंधनकारक असल्याने धुळे जिल्हा पांझरा नदीवरील दातर्ती ता. साक्री व बोरी नदीवरील निमगुळ धुळे ग्रामीण, येथील प्रस्तावित असलेल्या वाळू घाटांच्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यासाठी रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दि. १४/१०/२०२१ उप जिल्हाधिकारी (प्रशासन) यांचे कडून प्राप्त झाला. त्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, धुळे यांच्या मान्यतेने दि. २६/११/२०२१, रोजी जाहीर लोकसुनावणी घेण्याचे आयोजित करण्यात आले होते. त्या अनुषंगाने याबाबतची जाहीर सुचना दि. २६/१०/२०२१ रोजी लोकमत व टाईम्स ऑफ इंडिया या दैनिक वर्तमान पत्रामध्ये प्रकाशित करण्यात आली होती.

तसेच केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या अधिनियम, २००६ व सुधारीत अधिसुचना दि. ०१/१२/२००९ मधील तरतुदी प्रमाणे सदर प्रकल्पाबाबतच्या पर्यावरण व्यवस्थापन अहवालाच्या प्रति मराठी व इंग्रजीत शासनाच्या जिल्हाधिकारी कार्यालय धुळे ,जिल्हा उद्योग केंद्र, धुळे, जिल्हा परिषद कार्यालय धुळे, उपविभागीय कार्यालय धुळे, तहसिल कार्यालय, धुळे व साक्री, ग्रामसेवक/ सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, दातर्ती ता. साक्री व निमगुळ ता. धुळे, उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, धुळे, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, नाशिक, या कार्यालयांमध्ये इच्छुक नागरिकांना अभ्यास करण्याकरिता उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणीचा मूळ उद्देश प्रस्तावीत वाळू घाट प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रस्तावीत वाळू प्रकल्पाविषयी व या प्रकल्पामुळे होणारा परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे , प्रकल्पास बंधनकारक असणाऱ्या प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा व त्या अनुषंगाने माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनांचा विचार करणे, याबाबत परिसरातील नागरिक, सामाजिक सस्थांचे प्रतिनिधी यांनी सदरच्या वाळू घाटाबाबत आक्षेप, सुचना, टिका-टिप्पणी तोंडी किंवा लेखी स्वरुपात (ईमेलव्दारे) कळवाव्यात हि विनंती करण्यात आली होती. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे व उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, धुळे येथे सदर प्रकल्पाबाबत आक्षेप, सुचना, टिका-टिप्पणी तोंडी किंवा लेखी स्वरुपात (ईमेलव्दारे) एकही हरकत/सुचना प्राप्त झालेली नाही.

पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी खालील प्रमाणे अधिकारी व नागरीक उपस्थित होते.

१. श्री. प्रविण बागुल - जिल्हा खनिकर्म अधिकारी
२. श्री. प्रविण चव्हाणके – तहसीलदार साक्री
३. श्री. रमेश गिते – प्रमुख आरेखक जि. प. बांधकाम धुळे.
४. सौ. गायत्री सैदांणे – तहसिलदार धुळे
५. श्री. योगेश भगवान पवार – उपसरपंच (दातर्ती)
६. श्री. एच. बी. चोधरी – सरपंच (दातर्ती)
७. श्री. व्ही. डी. पाटील – ग्रामसेवक (दातर्ती)

**श्री. अजय चव्हाण (संयोजक)** :- माननीय अध्यक्ष महोदय यांचे पूर्वपरवानगीने प्रकल्प प्रवर्तकास पीपीटीचे सादरीकरण करण्यासाठी विनंती केली.

**सौ. हेमांगी पाटील (भामरे) (उप-जिल्हाधिकारी अधिकारी) :- मौजे दातर्ती ता. साक्री व बोरी नदीवरील निमगुळ धुळे ग्रामीण** येथील वाळू घाटांची जाहीर लोकसुनावणी प्रकल्पाबाबतची माहिती थोडक्यात सांगितली.

**श्री. अजय दौ. चव्हाण (उप-प्रादेशिक अधिकारी)** :- कोणाला आपले विचार/ टिका टिपणी, आक्षेप असतील तर ते मांडावे असे अव्हान केले.

| अ. क्र. | **उपस्थितांचे नाव व उपस्थित केलेले विचार/ टिका टिपणी, आक्षेप.** | **प्रकल्प प्रस्तावकाकडून करण्यात आलेला खुलासा** |
|---|---|---|
| १ | **श्री. हिरामण चौधरी (दातर्ती सरपंच)** –<br>यांनी विचारले की, वाळू उपसा करण्याचा कालावधी किती व खोली किती असेल. तसचे ग्रामपंचायतीला यांचा काय फायदा होणार आहे. | **सौ. हेमांगी पाटील (भामरे) (उप-जिल्हाधिकारी अधिकारी)** :- तालुका स्तरीय वाळू सनियंत्रण समितीने दातर्ती ता. साक्री या वाळू घाटाच्या सर्वेक्षणानुसार निश्चित केलेली वाळू उत्खननाची खोली ०.५० मी. पर्यंत राहील.<br><br>महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्र.गौखनि-10/0219/प्र.क्र.9/ख-1, दि. ०३/०९/२०१९ (सुधारित वाळू धोरण) मधील परिच्छेद क्र. IV (4) मधील तरतुदी नुसार वाळू घाटाच्या सर्वोच्च बोलीच्या रकमेमधून वाळूच्या स्वामित्वधनाची रक्कम वजा करुन, उर्वरित रकमेपैकी शासन निर्णयात दिलेल्या टप्प्यानुसार योग्य तो निधी ग्राम पंचायतीला वितरीत केला जाईल. |

**श्री. मा. संजय गायकवाड, (अध्यक्ष) :-** यांनी असे सांगितले की, लिलावाव्दारे वाळू उपलब्ध झाली तर चो-या थांबतील. व सदरची सुनावणी ही वाळूचा लिलाव नसुन लिलाव पुर्वीची शासकीय प्रक्रिया असल्याचे सांगितले, तसेच सर्व प्रक्रीया शासन निर्णयाप्रमाणे होणार असल्यामुळे गावास कुठलेही नुकसान न होता फायदाच होणार असल्याचे सांगितले. तसेच उपस्थित नागरिकांनी मांडलेल्या सर्व मुद्यांची यथोचित नोंद घेण्यात आली असून त्यांचा समावेश जनसुनावणीच्या इतिवृत्तामध्ये केला जाईल अशी माहिती दिली. प्रस्तावीत वाळू घाटांच्या जनसुनावणीच्या वेळी अधिका-यांनी दिलेल्या सर्व आश्वासनांची पुर्तता करण्याबाबत व हवा, पाणी, व ध्वनी प्रदुषण नियंत्रण बाबत आवश्यक ती यंत्रणा बसविण्याबाबत सुचित केले. जिल्हा प्रशासनातर्फेसुध्दा प्रकल्पाच्या कामकाजावर देखरेख ठेवली जाईल असे त्यांनी सांगितले.

जनसुनावणीचे संयोजक श्री. अजय दौ. चव्हाण, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, धुळे यांनी उपस्थित नागरिकांनी मांडलेल्या सर्व मुद्यांची यथोचित नोंद घेण्यात आली असून त्यांचा समावेश जनसुनावणीच्या इतिवृत्तामध्ये केला जाईल. मा. अध्यक्षांच्या परवानगीने संयोजक यांनी जनसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर केले.

| | |
|---|---|
| **श्री. अजय चव्हाण** | **श्री. संजय गायकवाड** |
| संयोजक, जनसुनावणी समिती | अध्यक्ष, जनसुनावणी समिती |
| तथा उप-प्रादेशिक अधिकारी, | तथा |
| म.प्र.नि. मंडळ, धुळे. | अप्पर जिल्हा दंडाधिकारी, धुळे. |